# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक १६१ वा बुधवार दि.२२ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# जालन्यात धनगर समाजाच्या आंदोलनाला हिंसक वळण, जिल्हाधिकारी कार्यालयाची तोडफोड




जालना– जालन्यात धनगर समाजाच्या आंलोदलनाला हिंसक वळण लागले आहे. जमलेल्या आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दगडफेक करत खिडकीच्या काचा फोडल्या आहेत. याठिकाणी उभ्या असलेल्या गाड्यांची तोडफोड करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यासाठी शेकडोंच्या संख्येने आंदोलक जमले होते. यावेळी ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.

धनगर आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये घुसले आणि त्यांनी तोडफोडीला सुरुवात केली. जिल्हाधिकारी कार्यालय, बाहेर ठेवलेल्या कुंड्या, खुर्च्या यांची नासधूस करण्यात आली. कार्यालयाच्या खिडक्यांच्या काचा फोडण्यात आल्या. यावेळी पोलिसांची संख्या कमी असल्याने त्यांना शेकडोंच्या संख्येने असलेल्या आंदोलकांना रोखता आले नाही.

काही दिवसांपूर्वी मराठा आंदोलनाच्या मुद्द्यावरुन जालन्यात मोठी नासधूस घडून आली होती. आता पुन्हा जालना जिल्ह्यातच आंदोलक हिंसक झाल्याने पोलिस यंत्रणेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांना आंदोलक आक्रमक होतील असे वाटले नव्हते का? तसेच आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येत असताना कोणतीही तयारी करण्यात आली नव्हती का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## अद्वय हिरे यांच्या पोलिस कोठडीत वाढ

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून रेणुका यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था कर्ज फसवणूक प्रकरणाच्या आरोपावरून पोलिस कोठडीत असलेले शिवसेना (उबाठा) उपनेते अद्वय हिरे यांच्या पोलिस कोठडीत पुन्हा वाढ करण्यात आली.येथील न्यायालयाने त्यांना २३ नोव्हेंबरपर्यंत (तीन दिवस) पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.रेणुका यंत्रमाग संस्थेकरिता कर्ज घेण्यासाठी कमी मूल्यांकनाचे तारणाच्या आधारे ७.४६ कोटी कर्ज घेऊन कर्जाची परतफेड न करता फसवणूक केल्याप्रकरणी नाशिक ग्रामीणचे आर्थिक गुन्हे शाखेने हिरे यांना बुधवारी (ता. १५) भोपाळ येथून अटक केली होती. यानंतर गुरुवारी (ता. १६) सकाळी त्यांना न्यायालयात उभे करण्यात आले होते.त्या वेळी अपर सत्र जिल्हा न्यायाधीश यू. एस. बघेले यांनी हिरे यांना २० नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला होता.

# आता विटनेस बॉक्समध्ये सुनावणी; शिवसेना आमदार अपात्रतेसंदर्भात सभागृहात या मुद्द्यावरुन खडाजंगी!



मुंबई– २१ जून २०२२ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पीए यांना पाठवलेला मेसेज विधानसभा अध्यक्षांकडून रिकॉर्डवर घेण्यात आला आहे. तसेच व्हिपबाबत पाठवण्यात आलला ईमेल रिकॉर्डवर घेण्यात आलाय. यावेळी शिंदे गटाच्या वकीलांनी इंग्रजीतील याचिकेवरुन सुनिल प्रभू यांना घेरण्याचा प्रयत्न केला. प्रभू यांनी मराठीतून प्रश्न विचारण्याची मागणी केली. तुमचे शपथपत्र इंग्रजीतून आहे, मग तुम्ही शपथपत्रावर स्वाक्षरी कशी केली, असा सवाल शिंदे गटाचे वकील महेश जेठमलानी यांनी केला.ठाकरे गटाचे प्रतोद सुनिल प्रभू यांची साक्ष झाल्यानंतर जेठमलानी यांनी त्यांची उलटतपासणी केली. सुनिल प्रभू यांनी सादर केलेलं इंग्रजीतील शपथपत्र यात त्रुटी असल्यांचं शिंदे गटाचं म्हणणं आहे. सुनिल प्रभू हे ठाकरे गटाचे प्रतोद आहेत. त्यामुळे त्यांची साक्ष महत्त्वाची ठरणार आहे. अशा परिस्थिती त्यांना घेरण्याचा प्रयत्न शिंदे गटाच्या वकीलांनी केला. इंग्रजी आणि मराठीचा मुद्दा उपस्थित करुन कायदेशीर कोंडी करण्याचा प्रयत्न झाला.शपथपत्रातील सर्व कथन, प्रत्येक शब्दांवर आम्ही ठाम आहोत. शपथपत्र इंग्रजीत असले तरी ते मी समजून घेतले आहे. वकील असिम सरोदे यांनी मला ते वाचून दाखवले आहे. त्यानंतरच मी शपथपत्रावर स्वाक्षरी केली, असं प्रभू म्हणाले. जेठमलानी यांनी प्रभूंना विचारले की, तुम्हाला इंग्रजी वाचता लिहता येते का? यावर ते म्हणाले की, मला इंग्रजी कळते, वाचतो, समजतो पण मला माझ्या मातृभाषेत जास्त कळतं म्हणून मी तीच भाषा वापरतो.वकिलांच्या दोघांच्या वैयक्तिक टीकाटिप्पणी वरून अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. व्यक्तिगत टीकाटिप्पणी करू नका. तुमचा मुद्दा कायदेशीर रित्या मांडा, असं अध्यक्ष म्हणाले. महेश जेठमलानी व देवदत्त कामत यांच्यातील वैयक्तिक टीकाटिप्पणी नंतर अध्यक्षांकडून नाराजी पाहायला मिळाली.सर्व युक्तिवाद आणि आक्षेपाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे अशी मागणी ठाकरे गटाचे वकिल देवदत्त कामत यांनी केली. यावर, विधानसभा अध्यक्षांनी ही मागणी धुडकावली.सर्व युक्तिवाद आणि आक्षेप हे रेकॉर्डवर घेतले जात असल्याचा निर्वाळा अध्यक्ष नार्वेकर यांनी दिला. सतत व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याची मागणी आपण करत आहात.मी तीनवेळा मागणी फेटाळल्यानंतरही आपण ही मागणी करत आहात. हे चुकीचं आहे, असं म्हणत अध्यक्षांनी कामतांना झापले शिवसेनेत पडलेल्या फुटी वेळी पक्षाने पाठवलेल्या नोटीस, तत्कालीन वृत्तपत्रांची कात्रणे, पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांचे आभार मानण्यासाठी केलेल्या पोस्ट, हे सर्व पुरावे म्हणून ठाकरे गटाकडून सादर केले जात आहे

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या नौकर भरतीत भूकंपग्रस्तांना पूर्ण कोटा द्यावा – संतोष भाऊ सोमवंशी



लातूर: महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या दिनांक २०/११/२०२३ रोजी च्या जाहिरातीत भूकंपग्रस्तांना २ टक्के कोट्यानुसार आरक्षण कोटा पूर्ण केला नाही तरी भूकंपग्रस्तांना २ टक्के कोट्यानुसार पूर्ण जागा देऊन जाहिरात पुर्नप्रकाशित करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित सेवा योजना जाहिरात क्रमांक ९/२०२३ अंतर्गत २०/११/२०२३ रोजी मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) यांच्या अधिकारात करण्यात आलेल्या विद्युत सहाय्यक (पारेषण) या पदाच्या जाहिरातीत १९०३ पदाकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यात भूकंपग्रस्तांसाठी लागू असलेल्या २ टक्के आरक्षण अंतर्गत फक्त ६ जागा देण्यात आल्या आहेत.हा भूकंग्रस्त उमेदवारावर अन्याय आहे. सदरील जाहिरात भूकंग्रस्तासाठी राखीव असल्यास २ टक्के कोट्याप्रमाणे ३८ जागांसह पूर्णप्रकाशित करावी. प्रशासनाच्या वतीने भूकंपग्रस्त उमेदवारावर अन्याय वारंवार होत आहे.अन्याय दूर करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने भूकंपग्रस्त उमेदवारावर सहानुभूतीपूर्वक विचार करत तात्काळ ती जाहिरात स्थगित करत भूकंग्रस्ताच्या २ टक्के पूर्ण कोट्यासह पूर्णप्रकाशित करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# पनौती तिकडे गेले आणि भारत हरला

मुंबई : पीए मोदी म्हणजे पनौती मोदी आहेत, भारतीय टीम चांगले खेळत होती, पण हे पनौती तिकडे गेले आणि आपल्या टीमला हरवले अशी जळजळीत टीका काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी केली आहे. ते राजस्थानमधील एका प्रचारसभेत बोलत होते.नुकत्याच झालेल्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला सहा विकेट्सने हरवले. पूर्ण स्पर्धेत चांगली कामगिरी करूनसुद्धा अंतिम सामन्यात भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर झालेला सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: उपस्थित होते. त्यानंतर आता त्यांच्यावर राहुल गांधी यांनी टीका केली आहे. राहुल गांधी म्हणाले की, पीए मोदी म्हणजे पनौती मोदी, ते सामना पाहायला गेले आणि भारतीय संघ हरला. आपला संघ चांगली कामगिरी करत होता, पण पनौती तिकडे गेले आणि भारतीय संघाला हरवले.उद्योगपतींचे १४ लाख कोटी रुपये माफ नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, ते नुसता लोकांना भुलवतात. कधी इकडे नेतात तर कधी तिकडे नेतात. त्यांच्या धोरणाचा फायदा देशातल्या काही उद्योगपतींनाच झाला आहे. गेल्या नऊ वर्षाच्या कालावधीत मोदींनी देशातल्या दहा ते पंधरा उद्योगपतींचे १४ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. आता त्या उद्योगपतींमध्ये कोण गरीब होते? कोण मागासलेले होते? जातीय जनगणनेची मागणी जातीय जनगणनेवर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, मी संसदेत बोलताना जातीय जनगणनेचा मुद्दा उपस्थित केला आणि सरकारने मागासवर्गियांसाठी काम करण्याची मागणी केली.

# लातूर शहर महानगरपालिकेच्या धूळशमन वाहनाचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते लोकार्पण




लातूर :- शहरातील वायू प्रदूषण, रस्त्यावरील धूळ, माती यावर नियंत्रण आणण्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेने धूळशमन (डस्ट सप्रेशन) वाहन खरेदी केले आहे. या वाहनाचे मंगळवारी २१ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी त्यांनी वाहनाबाबत माहिती जाणून घेतली. महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त शिवाजी गवळी, उपायुक्त मयुरा शिंदेकर, जिल्हा सह–आयुक्त रामदास कोकरे, राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम विभागातील पंडित लोहारे, पर्यावरण सल्लागार राहुल बोबे यांचीही यावेळी उपस्थिती होती. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालय तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ अंतर्गत राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम विभागाकडून लातूर शहर महानगरपालिकेला वायु प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी निधी उपलब्ध झाला. या निधीमधून लातूर शहर महानगरपालिकेने शहरातील वायु प्रदूषण व घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध उपयोजना राबवण्यात येत आहेत. शहरातील वायु प्रदूषण कमी, धूळ कमी करण्यासाठी धूळशमन वाहन खरेदी करण्यात आले आहे. या वाहनातील मशीनद्वारे शहरातील वायु प्रदूषण कमी होण्यासाठी मदत होणार आहे.

# फकिरा ब्रिगेडच्या वतीने विविध मागण्यासाठी आझाद मैदानावर धरणे आंदोलन




मुंबई /प्रतिनिधी :- फकिरा ब्रिग्रेड या सामाजिक संघटनेच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे दि.२१ नोव्हेंबर २०२३ रोजी विविध मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले, सर्व मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजना तसेच कौशल्य विकासाच्या योजना सुरू कराव्यात ,क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, महाराष्ट्रात दलितांचे झालेले खून, आणि बलात्कार करणाऱ्यांना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी आणि अन्यायग्रस्तांचे जिल्ह्याच्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे, दलित,बहुजन समाजातील लोकांनी कसलेल्या गायरान जमिनी कसणा–यांच्या नावे करण्यात याव्यात,सारथी, महाजोती प्रमाणेच बार्टीच्या सर्व विद्यार्थ्यांना पीएच.डी.साठी फेलोशिप देण्यात यावी, घरकुल योजनेत शहरी व ग्रामीण असा भेद न करता सर्वांना सारखेच अनुदान देण्यात यावे या विविध मागण्यासाठी प्रा.डॉ.संजय शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत धरणे आंदोलन करण्यात आले यावेळी प्रदेशाध्यक्ष श्रीरंग सरवदे ,राज्य कार्याध्यक्ष प्रा.राजेंद्र लोदगेकर, संजय विरूळे, बाळासाहेब वाघमारे, मच्छिंद्र खंदारे, बाबासाहेब नवगिरे, सूर्यकांत कदम, गोविंद धबडगे,उषा भोसले, मनिषा भोसले,शकीला शेख, कल्पना सोणावणे,माधूरी कांबळे, नागिनी थोरात, राधिका गवळी शितल हाताळकर, बालाजी पौळकर, अविनाश साठे, सोनिया उबाळे,ताहेर तन्वीर अन्सारी, शबाना इस्माईल सय्यद, सय्यद अब्बास, जगदीश सोनटक्के इ.कार्यकर्त्यांची उपस्थित होती

# सिध्देश्वर सहकारी बँकेचे सहकार क्षेत्रातील योगदान महत्वाचे जेष्ठ संचालक मन्मथप्पा लोखंडे यांचे प्रतिपादन



लातूर :- आज सहकार क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून येत आहेत. सिध्देश्वर सहकारी बँकेच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य व्यक्तींना मोठ्या प्रमाणात अर्थसाह्य करून शेती विकासामध्ये मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे त्यामुळेच बँकेचा सहकार क्षेत्रामध्ये एक वेगळा नावलौकिक असल्याचे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मन्मथप्पा लोखंडे यांनी बोलताना व्यक्त केले महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य दालनातील सिद्धेश्वर सहकारी बँक लि. लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये १४ संचालक बिनविरोध आणि ०५ संचालक मतदान प्रक्रियेतून निवडून आले त्याबद्दल त्यांचा सत्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ संचालक ड. श्रीकांतप्पा उटगे, संचालक अशोकप्पा उपासे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना मन्मथप्पा लोखंडे म्हणाले की, सिध्देश्वर सहकारी बँकेची निर्मितीच शेतकरी आणि सर्वसामान्य व्यक्तीच्या कल्याणासाठी झाली असल्यामुळे सातत्याने शेती आणि उद्योगासाठी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला जातो असेही ते म्हणाले.

यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे म्हणाले की, सिद्धेश्वर बँकेच्या माध्यमातून अनेक गरजू आणि गरीब व्यक्तींना कर्ज पुरवठा झाल्याने आज त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे. सिद्धेश्वर बँकेने नवतरुणांना कार्याची संधी दिल्यामुळे तरुण नेतृत्व निर्माण करण्याचा एक वेगळा आदर्श समाजामध्ये निर्माण केला आहे असे सांगून राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे विविध सोयी सुविधामध्ये सहकारी बँकेने वाढ करण्याची आवश्यकता असल्याचेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखाडिवे यांनी केले तर आभार प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, योगेश मोदी, आनंद खोपे आणि भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय....

# गरज कौशल्यकेंद्री शिक्षणाची

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. यातील जमेची बाजू म्हणजे या लोकसंख्येत तरुणांची म्हणजेच २५ ते ३३ वयोगटातील लोकांची संख्या ९० कोटी इतकी असून ती उत्पादनशील लोकसंख्या म्हटली जाते. तथापि, या लोकसंख्येचे रूपांतर भारताला परफॉर्मिंग ॲसेटस्मध्ये म्हणजेच कुशल मनुष्यबळात करावे लागेल. यासाठी शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. मुंबईएवढे क्षेत्रफळ असणा–या जपानवर दुस–या महायुद्धात दोन अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. जपानची राज्यघटनाही अमेरिकेच्या पुढाकाराने लिहिली गेलेली आहे. असा देश १९७० पर्यंत जगातील दुस–या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था बनला, याचे मूळ जपानने मानव संसाधन विकासावर प्रचंड गुंतवणूक केली. शिक्षणाच्या क्षेत्रात विशेषत: संशोधन विकासासाठी मोठी गुंतवणूक केली आणि त्यातून अत्यंत कुशल मनुष्यबळ विकसित केले. तशाच प्रकारे भारतानेही कौशल्य विकासकेंद्री शिक्षणावर भर देण्याची गरज आहे. तरच आपला ब्रेन ड्रेनही रोखता येईल. ध्या २१वे शतक हे प्रामुख्याने ज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. तर २० वे शतक हे प्रामुख्याने युद्धाचे शतक म्हणूनच पाहिले जाते. ज्ञान हा समाजाच्या प्रत्येक घटकाचा आधार बनला आहे. आत्ता आपली अर्थव्यवस्थाही ज्ञानाधिष्ठीत झाली आहे. थोडक्यात आपल्या अर्थव्यवस्थेचा आधारही ज्ञान बनलेला आहे. भारताने २०२७–२८ पर्यंत आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तसेच त्यापुढील काळात १० ट्रिलियन डॉलर्सपर्यंत झेप घेण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. त्या दृष्टीकोनातून देशाच्या आर्थिक विकासाचा दर ७ ते ८ टक्के कायम कसा ठेवता येईल, भारताची निर्यात कशी वाढवता येईल, आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच विदेशी गुंतवणूक कशी वाढवता येईल या दृष्टीने प्रयत्न होत आहेत.यामध्ये भारताच्या मन रिसोर्स अर्थात मानवी साधनसंपत्ती किंवा मनुष्यबळाचा उपयोग कसा कुशलतेने करता येईल याचा विचार प्राधान्याने होणे गरजेचे आहे. यासंदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न सातत्याने समोर येत आहे तो म्हणजे भारतातून होणारे ब्रेन ड्रेन. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातून उच्चविद्याविभूषित, कौशल्यप्राप्त मनुष्यबळ अमेरिका–युरोपकडे स्थलांतरीत होण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे. यामुळे भारत आज टॅलेंट एक्स्पोर्ट कंट्री म्हणजेच कौशल्य निर्यातदार देश म्हणून पुढे येताना दिसत आहे. परिणामी, आज 'पढेगा इंडिया तो बढेगा अमेरिका' असे म्हणण्याची वेळ आली आहे. दरवर्षी साधारणत: जून ते ऑगस्ट महिन्यांमध्ये इंजिनियरींग, मॅनेजमेंट या शाखांमधील तरुण प्रचंड मोठ्या संख्येने परदेशात जाण्यासाठी सरकारी कार्यालयांमध्ये रांगा लावताना दिसतात. यासाठी बँकांकडून ५०–५० लाखांपर्यंतची कर्जे घेतली जात आहेत. परदेशात जाणा–या दुसरीकडे, हे टॅलेंट तयार करण्यासाठी म्हणजेच बुद्धीवान, प्रज्ञावान, कौशल्याधारीत पिढी घडवण्यासाठी भारत प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करत आहे. विशेषत: भारतातील आयआयटींमधून विदेशात जाणा–यांची संख्या खूप अधिक आहे. गेल्या ५० वर्षांमध्ये २५ हजारांहून अधिक आयआयटीयन्स अमेरिका आणि युरोपमध्ये स्थायिक झालेले आहेत आणि तिथे कमाई करुन तेथील शासनाला कररुपाने भरभक्कम पैसा देताहेत. भारताला १० ट्रिलियन डॉलरचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर हा ब्रेन ड्रेन रोखणे अत्यंत गरजेचे आहे. अलीकडच्या काळात या ब्रेन ड्रेनसंदर्भात जाहीर झालेले आकडे अत्यंत धक्कादायक आहेत. अमेरिकेमध्ये दर १३०० लोकांमागे १ भारतीय डॉक्टर आहे. इंग्लंडमध्येही दर १००० लोकांमागे १ भारतीय डॉक्टर किंवा हेल्थवर्कर दिसून येतो. वस्तुत:, या कौशल्यवान, प्रज्ञावंतांची भारतालाही गरज आहे. परंतु भारताला बगल देत परदेशांकडे धाव घेण्याचा प्रवाह हा कमालीचा वाढत चालला आहे. अडीचशे वर्ष अन्यायी राजवट करणा–या ब्रिटिशांनी भारताची प्रचंड लूट केली होती. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, उद्योगधंद्यांच्या विकासासाठी स्किल्ड मॅनपॉवरची म्हणजेच कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची प्रचंड गरज होती. यासाठी आयआयटी आणि आयआयएमची निर्मिती करण्यात आली. त्यांना मोठमोठे कॅम्पस देण्यात आले. त्यांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आले. त्यातून गेल्या मोठ्या प्रमाणावर उच्चशिक्षित कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार झाले; परंतु या विद्यावानांना त्यांच्या प्राविण्याला पूरक ठरतील अशा रोजगारसंधी देशात उपलब्ध होत नव्हत्या. सरकारी क्षेत्रातील काही कंपन्यांची उद्योगधंद्यांमध्ये मक्तेदारी होती. त्यामुळे या बुद्धीवंतांचे अमेरिका आणि अन्य प्रगत देशांमध्ये स्थलांतर होऊ लागले. तेथे त्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी मिळू लागल्या; तथापि, आज ७५ वर्षांनंतरही हा प्रवाह तसाच कायम आहे. आज भारत शिक्षणक्षेत्रावर सुमारे ८५ हजार कोटी रुपये खर्च करतो. यापैकी जवळपास २५ टक्के निधी आयआयटी आणि आयआयएमसारख्या उच्च शिक्षण संस्थांवर खर्च केला जातो. अर्थात, या संस्थांची एन्रोलमेंट क्षमता खूप कमी आहे. त्यामुळे अगदी मूठभर लोकांना आयआयटी–आयआयएममध्ये प्रवेश मिळतो. प्रत्यक्षात आपल्याकडे गुणवत्तेची कमतरता नाही. त्यामुळे या संस्थांमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना ग्रेड –२, ग्रेड ३ शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. साहजिकच अशा वेळी हे विद्यार्थी या संस्थांपेक्षा परदेशातील शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश का घेऊ नये असा विचार करतात. कारण अव्वल संस्थांव्यतिरिक्त अन्य शिक्षणसंस्थांमधील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात कौशल्य निर्माण करतात, त्यांना किती प्रमाणात इंटर्नशिप मिळते, कॅम्पस इंटरव् ूमधून किती जणांना रोजगार मिळतो याबाबत प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे पालक ४०–५० लाखांचे कर्ज घेऊन मुलाला परदेशातील नामवंत शिक्षणसंस्थेत प्रवेश घेऊन दिला तर त्याच्यातील कौशल्यविकसन होईल, इंटर्नशिप चांगली मिळेल आणि पुढे जाऊन चांगला रोजगार मिळून त्याची कारकिर्दीची गाडी सुरळित होईल, असा विचार करतात. यातून परदेशी शिक्षणाकडे असणारा ओढा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. याचे मूळ भारतातील अत्यंत प्राविण्यदायी शिक्षण 'एक्सक्लुझिव्ह' बनले आहे.प्रत्यक्षात ते 'इनक्लुझिव्ह' बनण्याची गरज आहे. त्यामध्ये अधिकाधिक मुलांचा समावेश होणे गरजेचे आहे. यासाठी आयआयटी, आयआयएमची संख्या वाढवण्याची गरज आहे. लोकसंख्येच्या तुलनेत विद्यापीठांची संख्या पाहिल्यास, जपान आणि अमेरिकेमध्ये भारताच्या तुलनेत कितीतरी अधिक प्रमाणात विद्यापीठे आहेत. तसेच तेथे उच्च शिक्षणातील ग्रॉस एन्रोलमेंट रेशोही खूप अधिक आहे. भारतामध्ये प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करूनही नामांकित उच्च शिक्षणसंस्थांमधील एन्रोलमेंटचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली आहे. दुसरीकडे ग्रेड–२ आणि ग्रेड ३ दर्जाच्या शैक्षणिक संस्थांकडून तयार करण्यात येणारे बहुतांश अभ्यासक्रम हे 'मार्केट ओरिएंटेड' नाहीयेत. या सर्व पार्श्वभूमीवर विचार करता भारतामध्ये आपण मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारतच्या माध्यमातून उत्पादनक्रांती घडवून आणायची असेल आणि चीनप्रमाणे एक्स्पोर्ट हब बनायचे असेल तर उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दरी सांधली गेली पाहिजे. त्यांच्यात सुसंगतपणा आला पाहिजे. येणा–या दहा वर्षांमध्ये कोणत्या क्षेत्रांना अधिक मागणी असणार आहे.

# सोर्बीट्रेट

गेल्या तीन वर्षात माझ्या जवळच्या पाच व्यक्तींनी हृदय विकाराच्या झटक्यांनी जीव गमावला. सर्वांची कारणे बरिचशी मिळती जुळती; छातीत जळजळ होणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अंगाला दरदरून घाम येणे, इतका की अगदी बनियन ओला होणे, मळमळणे, उलटी सदृश जाणीव होणे, पाठीत डाव्या बाजूला, डाव्या हातात, किव्वा जबड्यात विचित्र दुख–णे, वगैरे या पैकी काही कारणे एकाच वेळेस भासू लागल्यास, समस्या गंभीर आहे हे ताबडतोब लक्षात येणे आवश्यक आहे.या पाच व्यक्तींच्या शिवाय इतरही काही व्यक्ती, ज्यांचे निधन झाले, त्याबद्दल मुद्दाम लिहितो. यातील कुणालाच कसलाच त्रास आधी न्हवता, असे मी मुळीच म्हणणार नाही, केवळ त्यांनी तो त्रास अंगावर काढला, म्हणजे काय, छे हो मला काय होतंय, आपण आज पर्यंत डॉक्टरांच्या दाराची पायरी चढलो नाही, अश्या किरकोळ शारीरिक तक्रारी मी घरीच सोडवतो, मी दोन तास व्यायाम करतो, दररोज १५ किमी सायकल चालवतो, पाच किमी दररोज चालतो, पोहतो, काही बहाद्दर म्हणतात चार पेग घेतल्याने हृदयाचे स्नायू लवचिक राहतात म्हणून दररोज पितो, वगैरे कारणे देत, फुशारकी मारत हृदयाने दिलेल्या धोक्याच्या सुचनेकडे कानाडोळा केला. या सो कॉल्ड धट्टेकट्टे ना आता जेव्हा झटका बसला, त्यानंतर विद्युत चपळाईने त्यांना जी मदत मिळायला हवी होती ती मिळाली नाही, व अकस्मात किव्वा दवाखान्यात घेऊन जाई पर्यंत, तोंडातून फेस येत शरीर कोसळले, व प्राण ज्योत मावळली. विषय अतिशय साधा पण महत्वाचा आहे, तो हा ही यातील जवळपास सर्व जण नक्की वाचलेच असते, जर त्यांनी सोर्बीट्रेट नावाची गोळी त्वरित जिभेखाली ठेऊन , डॉक्टरकडे गेले असते. सोर्बीट्रेट हे (लाईफ सेविंग ड्रॅग,) जीवन वाचविण्याचे औषध आहे, व किंमत रुपये दोन पेक्षाही कमी, म्हणजे रावा पासून रंकापर्यंत प्रत्येकाला परवडू शकणारे औषध. ज्या लोकांना हृदयाच्या त्रास आहे हे माहीत आहे, अश्या व्यक्ती, नियमित औषधे घेत असल्याने त्यांना झटका होण्याचा धोका कमी किव्वा नसल्यागत दिसून आला आहे. या व्यक्ती हृदय विकाराच्या झटक्याने अचानक मरणे पाहण्यात येत नाही. केवळ त्याच व्यक्ती अचानक मरतात ज्यांचा आजारी असण्याचा, व्याधी असण्याचा इतिहास कोरा असल्याचा त्यांना व त्यांच्या जवळच्या लोकांना भ्रम असतो. आजकालचे बैठे जीवनमान त्यात चमचमीत तेलकट खाणे, यामुळे वयाच्या तिशी पासूनच आपल्या देशात लोकांना हृदयाशी निगडित व्याधी दिसू लागतात. प्रश्न आहे तो हा की त्या वेळीच ओळखणे, व उपाय म्हणून नियमित औषध घेणे. ज्यांना औषधाची आवश्यकता नाही, थोडक्यात जे धट्टेकट्टे, या श्रेणीत स्वतः ला बसवतात, त्यांच्यासाठी हा लेख लिहिण्याचा प्रपंच आहे. सोर्बीट्रेट ही गोळी प्रत्येक घरात हवी. अश्या किमान आठ ते दहा गोळ्या घरात अश्या ठिकाणी ठेवाव्यात की आवश्यकता भासल्यास काही सेकंदात उपलब्ध होऊ शकली पाहिजे. घरात जितक्या खोल्या असतील तिथे सहज सापडतील अश्या ठिकाणी किमान दोन गोळ्या ठेवा. दरवर्षी जुन्या टाकून नवीन गोळ्या त्या जागी ठेवा, म्हण–तात ना भूक नको पण शिदोरी हवी, अगदी तसेच काहीसे हे आहे, तुम्हाला याची गरज नाही या भ्रमात राहू नका, कारण असे म्हणणारेच हा हा म्हणता इहलोक सोडून गेले आहेत. महिलांनी व पुरुषांनी किमान दोन सोर्बीट्रेट गोळ्या पर्स व पाकिटात विशेष कप्प्यात ठेवाव्या. हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात किंवा तस्संम कार्यक्रमात ही द्याव्या. ही लाख मोलाची वस्तू आहे, हे लक्षात घ्या.

सोर्बीट्रेट गोळीचे महत्व घरातील अबाल वृद्धांना माहीत असायला हवे, तसेच गोळी कुणाच्याही हाताशी तात्काळ लागली पाहिजे, तरच जीव वाचविणे शक्य होईल. मी डॉक्टर नाही, हा लेख नामवंत डॉक्टरांनी मला दिलेल्या माहितीच्या आधारे लिहिलेला आहे. यात काही शंका असल्यास आपल्या नजीकच्या डॉक्टरांचा, किंवा फॅमिली फिजिशियनचा सल्ला घ्यावा. जगप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ वी नितु मांडके हे नेहमी सांगायचे की तुम्हाला हृदयविकार असो की नसो ीलळीरींश कायम तुमच्या जवळ असली पाहिजे . तुम्ही प्रवास करत असाल तर बस, रेल्वे मध्ये कोणालाही याचा फायदा होऊ शकतो आणि त्याचा जीव वाचू शकतो.

---------------

**विजय लिमये**

(९३२६०४०२०४)

# विज्ञानाचा आधार घेऊन अज्ञानाचा प्रचार..

भारताकडे सर्वकाही मुबलक प्रमाणात असूनही भारत मागे असण्याचे कारण म्हणजे देशात माणसा माणसात विषमता पाळून केलेला माणसाचाच द्वेष व स्वतःला शिक्षीत समजून ही प्रचंड अंधविश्वास, पाखंड व भोंदूगिरी ला जोपासून त्याचा संबध थेट धर्माशी जोडून भावनिक होऊन अंधविश्वास पाखंड व भोंदूगीरी जोपासण्या साठी सर्वतोपरी पणाला लावणे हेच कारणे आहेत. विषमतेची घाण डोक्यात असल्याने गुणवत्ता, पात्रता यापेक्षा जातीला जास्त महत्त्व दिले जाते याचे असंख्य उदाहरणे आपल्या देशात आजही ज्वलंत आहेत. वैयक्तिक प्रगती होत असताना देशात विज्ञानाचा आधार घेऊन अज्ञान व अंधविश्वास पसरवणाऱ्या लोकांची संख्या कमी नाही. शिक्षीत वर्गही अंधविश्वास, पाखंड व भोंदूगिरी मध्ये जास्त फसलेला असून अंधविश्वासाचा संबंध थेट धर्माशी जोडून स्वतः चे अज्ञान अजून मजबूत करतो. विज्ञानाच्या प्रगती मुळे मोबाईल हाती आला आणि या मोबाईल च्या माध्यमातून अंधविश्वास पाखंड यालाच खतपाणी घालणे सुरू केले. अमूक अमुक मॅसेज एकवीस लोकांना फॉरवर्ड करा सायंकाळ पर्यंत चांगली बातमी ऐकायला मिळेल. अमुक अमुक जप करा, नाव उच्चारा अडचण दुर होईल. स्वतः ला शिक्षीत आणि गुणवान समजणाऱ्या लोकांनी असे केले तर अंगी गुणवत्ता आहे तरी कोणती हा प्रश्न सहज निर्माण होतो. भोंदूगिरी, जादुटोना यांच्या मार्फत अज्ञानाची जोपासना केली जाते आर्थिक, मानसिक, शारीरिक शोषण होते तरीही लोकांना ते हवे हवे वाटते. शिकलेल्या लोकांना सत्य कळत नसेल, तर्क करता येत नसेल तर त्या शिक्षणाचा व गुणवत्तेचा संबंध येतोच कुठे? महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले ज्यांनी आयुष्यभर एकाही व्यक्तीला न लुबाडता, किर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन करताना एकही रुपया न घेता, कोणत्याही व्यक्तीला अंगारा, धागा दोरा न देता आणि अंगारा धागे दोरा याने आजार, समस्या दुर होतात असा कोणताही दावा न करता येथे वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे काम केले. डोक्यात अंधविश्वास व पाखंड, थोतांड जोपासणाऱ्या लोकांनी संताचे विचार वाचले तर नाही उलट संताना घरात सुद्धां आणले नाही. आजही अपवाद वगळता प्रत्येक घरात अंधविश्वास, पाखंड, थोतांड व भोंदूगिरी ला खतपाणी घालणाऱ्या अज्ञानाच्या अनेक गोष्टी मिळतील परंतू ज्यांनी डोक्यातील अज्ञान दुर करून अंधविश्वासाच्या चक्रातून बाहेर पडण्याची शिकवण दिली अशा वैज्ञानिक दृष्टिकोन असलेल्या संत महापुरुषांचे फोटो यांच्या घरात दिसत नाहीत. सार्वजनिक ठिकाणी अंधविश्वास, पाखंड आणि भोंदूगिरी सुरू असेल तर विज्ञानामुळे हाती आलेल्या मोबाईल च्या कॅमेऱ्यातून अज्ञानाचा प्रचार केला जातो तेव्हा मात्र शिक्षणाचा अर्थच कळाला नाही याची खंत वाटून बौद्धिक पातळी सुधारली नाही याची काळजी वाटते. कारण बौद्धिक पातळी सुधारली नाही तर अशा लोकांकडून चुकिच्या गोष्टी करून घेणे सोपे जाते. आणि आज तेच होत आहे. शिकलेल्या लोकांकडून चुकिच्या गोष्टी करून घेऊन अडाणी भोंदु बुवा ने लुबाडल्याचे समोर आले. अर्थात अडाणी भोंदू करून पुजा हवन करण्यासाठी त्याला लाखो रुपये द्यायचे याला अज्ञान नाही तर बौद्धिक गुलामी म्हणतात. जर पुजा होम हवन करून घरात सुख शांती समृद्धी येत असेल तर पुजा करणारा पैसे घेऊन पुजा का करतो? त्याच पुजा हवन मधून त्याला ही सर्व काही मिळायला पाहिजे ना? अंधविश्वासाचा संबंध धर्माशी जोडून अंधविश्वासाला चिकटून बसतात. आणि अंधविश्वास, पाखंड भोंदूगिरी वर बोलले की यांना धर्म विरोधी वाटतात. अनेक भोंदु लोकांनी अंधविश्वास पसरवून लोकांचा पैसा, बायका लुटून अत्याचार केले तरीही लोक त्यांना दैव पुरुष, देवाचा अवतार, देवाची कृपा मानतात. या सर्व अंधविश्वास थोतांड, भोंदूगीरीचा संबंध धर्माशी जोडून त्याचे जतन करण्यात धन्यता मानणाऱ्यांनी धन्यता मानावी यामध्ये काहीही शंका नाही. परंतु धर्माच्या नावाखाली पोसली गेलेला अंधविश्वास, पाखंड, थोतांड हे धर्मापुरतेच मर्यादित ठेवावे त्याला सार्वजनिक करू नये. सार्वजनिक केले तर प्रश्न उपस्थित होणारच. सार्वजनिक म्हणजे काय तर जसे देशाचे संरक्षण करण्यासाठी राफेल हजारो करोडो रुपये खर्च करून विकत घेतले. आणि राफेल ची पुजा करून त्याला निंबु मिरची बांधण्यात आली. आता निंबु मिरची बांधून नेमकं काय साध्य करायचे हा प्रश्न तर उठणारच ना? राफेल कोणाच्या वैयक्तिक मालकीचे, वैयक्तिक धर्माचे आहे का? मग तेथे अंधविश्वास व पाखंड कसा पसरवला जातो? देशाच्या संसद भवनाचे उद्घाटन करताना होम हवन करण्या मागचा काय उद्देश? काय साध्य झाले? सध्या चा ज्वलंत मुद्दा तो म्हणजे जागतिक क्रिकेट चषक स्पर्धेमध्ये बीसीसीआयचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टिम जिंकण्यासाठी देशात अनेक ठिकाणी होम हवन करण्यात आले, अनेकांनी भविष्य वाणी केली आहे बिसीसीआय टीम जिंकेल असे भाकीत वर्तवले गेले. ह्या गोष्टी विज्ञानाच्या प्रगती मुळे तयार झालेल्या कॅमेरा, सॅटेलाईट च्या माध्यमातून टीव्ही, व सोशल मिडियावर मोठ्या उत्साहाने शेअर करण्यात आले. परंतु टीम हरली. होम हवन करून ही टीम हरत असेल तर होम हवन पुजा करून काय फायदा? पुजा होम हवन करून जर पाहिजे ते मिळत असेल तर मेहनत कशाला करायची हा प्रश्न साहजिकच उभा राहतो. परंतु विज्ञानाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर अज्ञानाचा प्रचार करण्यासाठी केला जातो आणि बहुसंख्य लोक त्यावर विश्वास ठेवतात तेव्हा कळते देशात बहुतांश गुणवत्ता कोणती आहे? विज्ञानामुळे हातात कॅमेरा, माईक असणाऱ्या एकाही पत्रकाराने एकही प्रश्न विचारला नाही की होम हवन पूजा भविष्य वाणी करूनही जर बीसीसीआय ची टीम हरलीच तर हे सर्व अंधविश्वास व पाखंडाचा भाग आहे असे म्हणावे का? पुजा होम हवन करून जर कप किंवा यश मिळाले असते तर भारतात सर्वच कप आणि सर्वच यश असते. असा एकही प्रश्न कोणी विचारला नाही. यालाच मानसिक गुलामी म्हणतात. देशात अंधविश्वास पाखंड थोतांड व भोंदूगिरी यावर जास्त विश्वास ठेवून ते पैसा कमवण्याचे माध्यम असल्याने देशात पाखंड पसरवणाऱ्या भोंदुची संख्या जास्त आहे. जगाच्या पाठीवर सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या देशात आणि अनेक दैवशक्ती, देवाचे दुत, चमत्कार असलेल्या देशात विज्ञानाच्या जोरावर किती जगविख्यात शास्त्रज्ञ झाले? अज्ञान परसवणारे भोंदु हजारो करोडेचे मालक झाले,. परंतु चंद्रयान बनवणारे शास्त्रज्ञ उपाशी आहेत. त्यांना पगारही नाही मिळाला. हि वस्तू स्थिती आहे. आपण वापरत असलेल्या मोबाईल, टीव्ही, रेडिओ, घड्याळ फॅन, फ्रीज, मोटारसायकल, कार, एसी, विद्युत, बल्ब, लॅपटॉप, संगणक यापैकी किती उपकरणाचा शोध भारतीय लोकांनी लावला? इतरांनी विज्ञानाची केलेली प्रगती आपण पैसे देऊन खरेदी करतो आणि त्यावरही अज्ञानच पसरवतो म्हणजे आपण कीती विद्वान आहोत? भारतात जसे भोंदू, होम हवन, चमत्कार, पाखंड आहे तसे इतर कोणकोणत्या देशात आहे? पण भोंदुगीरी, पाखंड, अंधविश्वासावर देशात धंदा सुरु आहे, आणि हा धंदा दिर्घकाळ सुरू राहण्यासाठी धंदा चावलणारे मालक अंधविश्वास पाखंड भोंदुगीरीला मजबूत करत आहेत. आणि बौद्धिक विकास न झालेले लोक लवकर आकर्षित होऊन फसत आहेत. अज्ञान आणि अंधविश्वास जोपासल्या मुळे आपण वैज्ञानिक क्षेत्रात पाहिजे तसी प्रगती करू शकलो नाही. आणि आजही आपण बाहेरच्या प्रगत राष्ट्राकडून आदर्श घेऊन जागृत होत नाही तर देशातील भोंदु अडाणी जो शिकलेल्या लोकांना अज्ञानाचा आधार घेऊन लुबाडतो अशा लोकांकडे जाऊन जिवनात सुख, यश, अपत्य प्राप्ती साठी याचना करतो. आणि हे सर्व विज्ञानाच्या मोबाईल मध्ये बंध करून आपले अज्ञान दाखवण्यासाठी विज्ञानामुळे तयार झालेल्या सोशल मिडियावर शेअर करतो. म्हणून देश वैज्ञानिक दृष्टीने मागास तर आहेच पण वैज्ञानिक दृष्टिकोन न स्विकारल्याने बौद्धिक दृष्टीने ही मागास आहे. डोक्यात अंधविश्वास, पाखंड भोंदुगीरी जोपासणारे आणि विज्ञान व सत्य नाकारणारे लोक कोणत्या बाबतीत बुद्धीजीवी, हुशार व गुणवंत होतील हा संशोधनाचा विषय असेल.

-------------

**विनोद पंजाबराव सदावर्ते**

समाज एकता अभियान

रा. आरेगांव ता. मेहकर

मोबा: ९१३०९७९३००

# ओव्हरथिंकिंग करताय? मग, जाणून घ्या आरोग्यावर होणारे 'हे' दुष्परिणाम



ओव्हरथिंकिंग म्हणजे कायं तर जे लोक जास्त प्रमाणात विचार करतात, त्याला ओव्हरथिंकिंग करणे असे म्हणतात. जास्त प्रमाणात विचार करणाऱ्या व्यक्ती या इतर सामान्य व्यक्तींच्या तुलनेत जास्त त्रासलेल्या आणि तणावाखाली असतात. असे लोक मग, स्वत:ला जास्त मानसिक आजारी बनवतात. मात्र, अतिप्रमाणात विचार केल्यावर याचा फक्त तुमच्या परिणाम होत नाही तर, तुमच्या शरीरावर ही याचा परिणाम दिसून येतो.

ओव्हरथिंकिंग केल्याने आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होण्याचा धोका असतो. कोणत्या आहेत या समस्या? चला तर मग जाणून घेऊयात.ओव्हरथिंकिंग केल्याने झोपेच्या समस्या आपण जेव्हा विचार करतो तेव्हा आपले जागरण होते, आपल्याला लवकर झोप येत नाही. मात्र, जेव्हा आपण ओव्हरथिंकिंग करतो किंवा जास्त प्रमाणात विचार करतो, तेव्हा झोपेच्या समस्या निर्माण होतात.अतिविचार केल्यामुळे झोप न येणे आणि सकाळी उठल्यानंतर मग थकवा, सुस्ती येणे इत्यादी समस्या निर्माण होतात. परिणामी, तुमचे वजन देखील झपाट्याने वाटते.रोगप्रतिकारक क्षमतेवर होतो परिणाम जेव्हा तुम्ही जास्त प्रमाणात विचार करता तेव्हा तुमच्या झोपेवर याचा परिणाम होतो. शिवाय, तणावाची स्थिती वाढते आणि यामुळे, शरीरात कॉर्टिसोल हार्मोन्सची पातळी अचानक वाढते.ही पातळी वाढली की त्याचा आपल्या रोगप्रतिकारक क्षमतेवर परिणाम होतो. यामुळे, रोगप्रतिकारक क्षमत कमकुवत होते. त्यामुळे, विविध प्रकारचे रोग, संसर्गजन्य आजार यांचा धोका निर्माण होतो.पचनक्षमतेवर होतो नकारात्मक परिणाम एखादी व्यक्ती जेव्हा जास्त प्रमाणात विचार करते तेव्हा तणावाची स्थिती निर्माण होते. ती व्यक्ती तणावाखाली जाते. जास्त ताण घेतल्याने त्या व्यक्तीच्या पचनक्रियेवर ही याचा परिणाम होतो.कारण, यामुळे पोटातील रक्तप्रवाह आणि ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. हे सर्व झाल्यामुळे, याचा पचनक्षमेतवर नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे, पोटाच्या समस्या निर्माण होण्याचा धोका नाकारता येत नाही.

# धनेगाव जी.प.च्या मुख्यध्यापिका ज्योती स्वामी यांना शेगाव येथे राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रधान




लातूर -लातूर तालुक्यातील धनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती मनोहर स्वामी यांना ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघाच्या वतीने दिला जाणारा शेगाव येथे क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मान्यवराच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

ज्योती स्वामी या एक विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका असून धनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये त्यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत या उपक्रमाची दखल घेऊन सदर पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे.

या वेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे माजी मंत्री संजय कुठे, नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर आडबले, पदवीधर आमदार अभिजीत वंजारी, तसेच राज्याध्यक्ष श्याम लेडे, राज्या उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, राज्य सरचिटणीस अनिल नाचपल्ले राज्य समन्वयक विजयकुमार पिनाटे,महिला जिल्हा अध्यक्ष रेखा सुडे,राष्ट्रीय ओबीसी महासंघ. लातूर हिरालाल पाटील आधीसह अनेक मान्यवर उपस्थित होते. धनेगाव येथील मुख्याध्यापिका ज्योती स्वामी यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेक स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# आल्याचा जास्त वापर करणे आरोग्यासाठी ठरू शकते हानिकारक, जाणून घ्या 'हे' दुष्परिणाम



वातावरण बदलले की, त्याचा आपल्या आरोग्यावर परिणाम होतो. बदलत्या वातावरणामुळे मग अनेक समस्यांना सुरूवात होते. सर्दी, खोकला आणि ताप इत्यादी समस्यांचे प्रमाण वाढते. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना या सर्दी-खोकला आणि तापाचा त्रास सुरू होतो.या समस्यांपासून दूर राहण्यासाठी मग काढा, आलं घातलेला चहा पिला जातो. थंडीमध्ये शरीराला ऊब मिळावी, यासाठी आपण उष्ण खाद्यपदार्थांचा आहारात समावेश करतो.थंडीच्या दिवसांमध्ये तर आलं घातलेला चहा जास्त प्रमाणात पिला जातो. मात्र, आल्याचे जास्त सेवन करणे हे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. हे तुम्हाला माहित आहे का? आल्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने कोणत्या समस्या निर्माण होतात? ते आपण जाणून घेऊयात.तोंडात जळजळ होते आल्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने तोंड येणे किंवा तोंडात जळजळ होण्याची समस्या निर्माण होऊ शकते. थंडीच्या दिवसांमध्ये तर आल्याचे सेवन हे मर्यादित प्रमाणात करावे.पोटाच्या समस्या आल्यामध्ये उष्णतेचे प्रमाण सर्वाधिक असते. त्यामुळे, जेव्हा आल्याचे जास्त प्रमाणात सेवन केले जाते, तेव्हा पोटात जळजळ आणि पचनाच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. कधीकधी पोट बिघडण्याची समस्या देखील होऊ शकते. आल्याचे अधिक प्रमाणात सेवन केल्याने, पोटाला सूज येणे आणि पोटात गॅसेसची समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे, आल्याचे सेवन मर्यादित प्रमाणात करा.साखरेची पातळी अचानक कमी होते जर तुम्ही खाद्यपदार्थांमध्ये आल्याचा जास्त समावेश केल्यास तुमच्या शरीरातील साखरेची पातळी अचानक कमी होते. तसेच, इन्सुलिनच्या पातळीत अडथळा निर्माण होतो. या अडथळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी ही अचानक कमी होते. हृदयासाठी धोकादायक आल्याचे जास्त प्रमाणात सेवन करणे, हे हृदयविकाराच्या रूग्णांसाठी धोकादायक ठरू शकते. तसेच, रक्तदाबाची समस्या असलेल्या लोकांनी देखील आल्याचे जास्त प्रमाणात सेवन करणे टाळावे.आल्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने हृदयाची स्थिती बिघडण्याची शक्यता निर्माण होते. तसेच, हृदयाच्या ठोक्यांमध्ये अनियमितता येऊ शकते.

# जुगारावर छापेमारी, ११ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल. ६८ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त. सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांची कारवाई

लातूर :- जुगारावर छापेमारी, ११ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल. ६८ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त. सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांची कारवाई या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याकरिता जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.निकेतन कदम यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर अहमदपूर येथे अवैध जूगारावर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १९/११/२०२३ रोजी काही इसम पैशावर तिर्रट जुगार खेळत आहेत अशी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर यांनी अहमदपूर येथील मटन मार्केट मधील गौतम निवृत्ती कांबळे यांच्या राहते घरी छापेमारी करून बेकायेशीररित्या जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आल्याने एकूण ११ इसमावर कार्यवाही करत त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ६८ हजार ४४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस ठाणे अहमदपूर मध्ये खालील नमूद इसमाविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम१८८७चा कलम ४,५कायद्यान्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१) आमजद आसनत कादरी, वय-४० वर्षे रा. दर्गापुरा, अहमदपूर
२ सिराज कलीमोददीन सय्यद, वय ३२ वर्षे रा. दर्गापुरा, अहमदपूर.
३. रझाक मैनोद्दीन बागवान, वय -३२ वर्षे रा. बागवान गल्ली, अहमदपूर.
४. सत्तारभाई जब्बार बागवान, वय ३१ वर्षे रा. बागवान गल्ली, अहमदपूर.
५. फिरदोस शिकुरसाब बागवान, वय -३३ वर्षे रा. इंदिरा नगर अहमदपूर.
६. विनायक प्रकाश गायकवाड वय-२० वर्षे र. साठे नगर अहमदपूर.
७. रतन मैनोद्दीन बागवान वय -३६ वर्षे रा क्रांती चौक अहमदपूर,
८. चांद मैनु शेख, रा. अहमदपूर
९. सावन कदम ,रा. अहमदपूर
१० जफर गोरेसाब शेख,रा. अहमदपूर
११. गौतम निवृत्ती कांबळे (घरमालक) रा. अहमदपूर

असे असून आरोपी क्रमांक ११ गौतम निवृत्ती कांबळे यांनी त्याच्या घरात जुगार घेण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे आणि ते मिळून जुगार चालवीत होते.

पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी मारुन कार्यवाही करण्याचे सत्र सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक १९/१०/२०२३ रोजी ठाणे अहमदपूर येथील कारवाईत पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी चाकूर सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री.निकेतन कदम यांचे नेतृत्वातील पथकामधील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी सदरची कामगिरी केली आहे.

पुढील तपास अहमदपूर पोलिस करीत आहेत.

# मराठवायातील ग्लोबल आडगाव चित्रपटा ची गोव्यात हवा

जागतिक पातळीवरील प्रतिष्ठित अशा गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ग्लोबल आडगाव चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. न्यूझीलंड, उत्तर कोरिया, रशिया अमेरिका, नायझेरिया येथील फिल्मेकर ने उदंड प्रतिसाद दिला ग्लोबल आडगाव च्या निवडीची घोषना सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. मनोज कदम निर्मित ,अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित,अमृत मराठे सह-निर्मित ग्लोबल आडगाव गोव्यात रंगणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात महाराष्ट्र शासनाने फिल्म मार्केटसाठी निवडला आहे. सोबतच गिरकी आणि बटरफ्लाय हे मराठी चित्रपटांचीही निवड करण्यात आली आहे. अमेरीकेत नुकताच ग्लोबल आडगाव या अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित मराठी चित्रपटाचा बेस्ट रायटर अवॉर्ड पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे.ग्लोबल आडगाव चित्रपटाच्या कथा-पटकथा-संवाद लेखनासाठी प्रख्यात सिने-दिग्दर्शक अनिलकुमार साळवे यांना ऑस्करच्या धर्तीवर बेस्ट रायटर सन्मान मिळाला आहे. गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ग्लोबल आडगावचा सन्मान म्हणजेच भारतीयांचा बहुमान होय. आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त लेखक अनिलकुमार साळवे दिग्दर्शित आणि शेतकरी पुत्र ,उद्योजक मनोज कदम निर्मित व अमृत मराठे सहनिर्मीत व डॉ. सिद्धार्थ तायडे सहदिग्दर्शित ग्लोबल आडगाव मराठी चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. अभिनेत्री किशोरी शहाणे, प्रसाद नामजोशी, हर्षित अभिराज, समीर आठल्ये आणि संदीप पाटील यांच्यासह पाच सदस्यांच्या तज्ञ समितीने ३० चित्रपटामधून या चित्रपटाची काळजीपूर्वक निवड केली होती. आपली जोरदार कथा आणि कलात्मक उत्कृष्टतेमुळे ग्लोबल आडगाव या प्रतिष्ठित चित्रपट महोत्सवात स्थान मिळाले आहे.

यंदा चित्रपटप्रेमिंच्या वर्तुळात 'ग्लोबलआडगाव' या मराठी चित्रपटाची सकारात्मक चर्चा आहे. कलकत्ता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ग्लोबल आडगाव चित्रपटाची अकिरा कुरोसावा यांच्या चित्रपटाशी तुलना केली गेली. ही मराठी चित्रपट सृष्टीसाठी अभिमान आणि गौरवाची बाब ठरली आहे.अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित, मनोज कदम निर्मीत आणि अमृत मराठे सह निर्मीत ग्लोबल आडगाव चित्रपट लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. अमेरिकेने बेस्ट रायटर पुरस्कार दिल्याने भारतीय चित्रपट सृष्टीची मान उंचावली आहे. सिल्व्हर ओक फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित 'ग्लोबलआडगाव' लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. ''ग्लोबल आडगाव' हा बहुआयामी लेखक आणि पुरस्कार विजेते व्यक्तिमत्व डॉ.अनिलकुमार साळवे दिग्दर्शित एक बिग-बजेट चित्रपट आहे. अभिनेता प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी सहदिग्दर्शन केले आहे.




पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासह 'ग्लोबल आडगाव' हा चित्रपट कोलकाता आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवडण्यात आला आहे. तसेच अधिकृतपणे न्यू जर्सी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल अमेरिका साठी निवडला आहे.या चित्रपटास देश-विदेशातील नामवंत प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.नुकत्याच संपन्न झालेल्या अजंताएलोरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अशोक कानगुडे याला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा जगातील प्रसिद्ध चित्रपट महोत्सवापैकी एक प्रतिष्ठित चित्रपट महोत्सव आहे.महाराष्ट्र शासनआयोजित तेराव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सिलव्हर ओक फिल्म्स एंटरटेनमेंट प्रस्तुत प्रख्यात सिने लेखक-दिग्दर्शक अनिलकुमार साळवे लिखित-दिग्दर्शित मनोज कदम निर्मित व अमृत मराठे सहनिर्मित, प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे अभिनित-सहदिग्दर्शित बहुचर्चित 'ग्लोबल आडगाव' चित्रपटाची निवड करण्यात आली.

गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मराठवाड्याचा गौरव ठरलेल्या प्रेक्षकांना भावनिक करणाऱ्या 'ग्लोबल आडगाव'या चित्रपटात सुप्रसिद्ध अभिनेता सयाजी शिंदे, उषा नाडकर्णी, उपेंद्र लिमये, अनिल नगरकर, सिद्धी काळे, शिवकांता सुतार, अशोक कानगुडे, महेंद्र खिल्लारे, रौनक लांडगे, अनिल राठोड, संजीवनी दिपके, डॉ. सिद्धार्थ तायडे, साहेबराव पाटील,प्रदीप सोळंके, रानबा गायकवाड, विष्णू भारती,जालिंदर केरे, विक्रम त्रिभुवन,विष्णू चौधरी, परमेश्वर कोकाटे, प्राजक्ता खिस्ते, ऋषिकेश आवाड विक्की गुमलाडू,मंगेश तुसे यांच्या प्रमुख भूमिकेत आहेत.प्रख्यात गायक आदर्श शिंदे , डॉ. गणेश चंदनशिवे आणि जसराज जोशी यांनी गीतांना स्वरसाज चढविला आहे. प्रसिध्द गीतकार डॉ.विनायक पवार, प्रशांत मांडपुवार, अनिलकुमार साळवे यांच्या गीतांना समीक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे. प्रशांत जठार, निर्मिती व्यवस्थापक सागर देशमुख, छायाचित्रण गिरीश जांभळीकर, संगीत विजय गावंडे, ध्वनी विकास खंदारे, कलादिग्दर्शन संदीप इनामके, संकलन श्रीकांत चौधरी, डीआय दिशा रंगालय, मेकअप मंगेश गायकवाड यांनी केला आहे. 'ग्लोबल आडगाव' या सिनेमांमधून शेती, माती, ग्रामसंस्कृती त्याचबरोबर ग्लोबलायझेशनच्या विळख्यात अडकलेला शेतकरी ,ग्लोबलायझेशन मुळे शेतीचे झालेले नुकसान अशा महत्त्वाच्या विषयावर या सिनेमाच्या माध्यमातून भाष्य करण्यात आलेले आहे. शेतीची झालेली दुर्दशा सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षक बघत असताना प्रेक्षक आपल्या डोळ्यातील पाण्यांना थांबू शकत नाही अशा अत्यंत भावनिक ,संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयाला या सिनेमाच्या माध्यमातून स्पर्श करण्यात आलेला आहे.'ग्लोबलआडगाव' लवकरच रुपेरी पडद्यावर झळकणार आहे.

# 'या' लोकांनी चुकूनही पेरू खाऊ नये, अन्यथा आरोग्याला हानी पोहचू शकते!



पेरू हे अतिशय पौष्टिक आणि चविष्ट फळ आहे, अनेकांना ते खायला आवडते. विशेषत: ज्यांची पचनक्रिया कमजोर आहे त्यांच्यासाठी हे आयुर्वेदिक औषधापेक्षा कमी नाही. या फळामध्ये व्हिटॅमिन बी ६, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फायबर, पोटॅशियम, फॉस्फरस, कॅल्शियम, लोह, झिंक, कॉपर, कार्बोहायड्रेट, अँटीडायबेटिक, डायरियाल, अँटीमाइक्रोबियल आणि अँटीफंगल गुणधर्म आढळतात. इतके पोषक तत्व असूनही हे फळ प्रत्येकासाठी फायदेशीर नाही. चला जाणून घेऊया कोणत्या लोकांनी पेरू खाणे टाळावे.जर तुमचे कोणतेही ऑपरेशन किंवा शस्त्रक्रिया होणार असेल तर तुम्ही २ आठवडे अगोदर पेरू खाणे थांबवावे, कारण या फळाच्या सेवनाने रक्ताभिसरणात समस्या निर्माण होऊ शकतात.पेरूचा कूलिंग इफेक्ट असतो, त्यामुळे ज्यांना सर्दी, खोकला यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो अशा लोकांनी पेरूचे सेवन अजिबात करू नये, कारण नंतर तुम्हाला बरे होण्यासाठी बराच वेळ लागेल.

पेरू आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे, परंतु ज्या लोकांना गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्यांचा सामना करावा लागतो त्यांनी या फळापासून दूर राहावे कारण यामुळे पोटदुखी आणि उलट्या होऊ शकतात.गरोदर महिला आणि स्तनपान करणाऱ्या मातांनी पेरूपासून दूर राहावे. हे तिच्या आणि मुलाच्या आरोग्यास हानी पोहोचवू शकते.एक्जिमाचा सामना करणार्यांनी पेरू खाऊ नयेत, कारण याच्या सेवनाने त्वचेवर जळजळ आणि खाज येऊ शकते. अशा परिस्थितीत पेरूची पानेही खाऊ नयेत.

# वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पप्पू चव्हाण यांनी स्वीकारला पदभार. बीड जिल्हा बंजारा समाज यांच्या वतीने सत्कार

## समाजकल्याण सहाय्यक आयुक्त रविंद्र शिंदे यांनी पदभार देऊन सत्कार करण्यात आला.

बीड / प्रतिनिधी :- माजी मंत्री पंकजाताई मुंडे व खा. डॉ. प्रिंतमताई मुंडे यांचे विश्वासू परळी तालुक्यातील कौठळी येथील बाळासाहेब उर्फ पप्पू चव्हाण यांची वसंतराव नाईक तांडा सुधार समितीच्या जिल्हाध्यक्ष म्हणून शासनाने नुकतीच नियुक्ती केली आहे. वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पप्पू चव्हाण यांनी पदभार स्वीकारला व कामकाज बाबत माहिती समजून घेतली. तसेच समाजकल्याण सहाय्यक आयुक्त रविंद्र शिंदे यांनी पदभार देऊन सत्कार करण्यात आला. दरम्यान बीड जिल्हा बंजारा समाज यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान,माजी मंत्री पंकजाताई मुंडे व खा. डॉ. प्रिंतमताई मुंडे यांनी माझ्यावर जो विश्वास टाकून जबाबदारी दिली तो विश्वास जन सामान्यांची कामे करून सार्थ करून दाखवू असे चव्हाण यांनी म्हटले आहे.





वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या अंतर्गत हाती घ्यावयाची कामे जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखालील समितीस सुचविण्याकरिता बंजारा बहुल जिल्ह्यासाठी स्थापन करावयाच्या समितीच्या अध्यक्षपदी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ तालुक्यातील कौठळीचे भाजपाचे युवा कार्यकर्ते बाळासाहेब भाऊराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली असून तसे आदेश शासनाच्या वतीने निर्गमित करण्यात आले. बीड जिल्हा समाज कल्याण कार्यालय येथे वसंतराव नाईक तांडा सुधार समितीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पप्पू चव्हाण यांनी पदभार स्वीकारला तसेच कामकाज समजून घेतले.त्यांचा समाज कल्याण सहाय्यक आयुक्त रविंद्र शिंदे यांनी पदभार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यालयात अधिकारी, कर्मचारी यानी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. दरम्यान, पंकजाताई मुंडे व खा. डॉ. प्रतिमताई मुंडे यांनी माझ्यावर एवढी मोठी जबाबदारी टाकली. जो विश्वास टाकून जबाबदारी दिली तो विश्वास जन सामान्यांची कामे करून सार्थ करून दाखवू असे चव्हाण यांनी म्हटले आहे. पंकजाताई मुंडे व खा. डॉ. प्रतिमताई मुंडे यांचा विश्वास सार्थ करून दाखवू असे ते म्हणाले. हे पद माझ्यासाठी खुप महत्वाचे आहे. पदाला न्याय देण्यासाठी मी वचनबद्ध आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने वसंतराव नाईक तांडा सुधार व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी बाळासाहेब (पप्पु) चव्हाण यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. बंजारा समाजातील युवा कार्यकर्त्यांला बंजारा समाजातील सर्वसामान्य लोकांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल अतिशय नम्र, जिद्द ,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर वरिष्ठांचा शब्द हा प्रमाण म्हणून काम करणार एक सर्वसामान्य कार्यकर्ता, वरिष्ठांच्या विश्वासास् पात्र ठरला असून या भविष्यात यशाबद्दल मिळालेल्या पदाचा भविष्यात त्याच्या हातून बंजारा समाजाची कायम चांगली सेवा घडो. यासाठी सकल बंजारा समाज बीड यांच्यावतीने बाळासाहेब (पप्पु) चव्हाण यांचा बीड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सोमवारी (ता.२०) भव्य सत्कार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार सोहळ्यास बीड जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक ,सांस्कृतिक क्षेत्रातील युवा, तरुण, युवा कार्यकर्ते , ज्येष्ठ नागरिक ,महिला भगिनी, अधिकारी, कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.


## शरद पवारही मला स्क्रीप्ट देऊ शकत नाहीत

मुंबई : जरांगेंच्या सरसकट मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षणाला भुजबळांचा विरोध आहे. यावरून रोहित पवारांनी त्यांच्यावर टीका केली होती. भुजबळांना स्क्रीप्ट कोण देतंय ते पहावे लागेल असे त्यांनी म्हटले होते. त्यांच्या या विधानाला आता भुजबळांनी उत्तर दिले आहे.'मी महाराष्ट्रात सगळीकडं एकटा जाऊ शकत नाही. पण इतर जे ओबीसी नेते आहेत त्यांनी कुठल्याही पक्षात असलं तरी ओबीसी आरक्षण बचावसाठी काम करत राहावं. हे आंदोलन राज्यभर चालू ठेवा. आमची मोट सुटलेली नाही.अडचणी काहीही असू शकतात त्यामुळे काही नेते जातील-येतील, मला याबद्दल रोष नाही. कुठल्याही पक्षात राहा पण ओबीसींसाठी लढा. माझ्या विरोधात लढलात तरी ओबीसींसाठी बोला,' असे आवाहन भुजबळांनी केले आहे.



## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या मुलीसह सुनेवर सीबीआयकडून आरोपपत्र दाखल

मुंबई : राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना केंद्रीय अन्वेषण ब्यूरोने (सीबीआय) चांगलाच झटका दिला आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याबाबत पुन्हा एक मोठी बातमी समोर आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने दिलेल्या क्लीन चिट अहवालाची माहिती लीक केल्याप्रकरणी अनिल देशमुख यांची मुलगी पूजा आणि सून राहत देशमुख यांच्यावर सीबीआयने आरोपपत्र दाखल केले आहे. सीबीआयच्या विशेष न्यायालयात हे आरोपपत्र दाखल करण्यात आले असून त्यात पूजा यांच्यावर कट रचल्याचा आरोप करण्यात आला आहे. पूजा यांनी हा अहवाल मिळवण्यासाठी अनिल देशमुख यांचे वकील आनंद डागासोबत कट रचला होता. त्यासाठी सीबीआयचे उपनिरीक्षक अभिषेक



तिवारी यांना अहवाल देण्यासाठी लाच देण्याची योजना केली होती. २९ ऑगस्ट २०२१ रोजी हा अहवाल माध्यमांमधून लीक झाला होता.अनिल देशमुख यांच्यावर मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमवीर सिंग यांच्या आरोपानंतर सीबीआयने चौकशी केली होती. त्याच प्रकरणात क्लीन चिट अहवाल हा लीक झाला होता. त्यामुळे सीबीआय अहवाल लीक प्रकरणात अनिल देशमुख यांची मुलगी पूजा आणि सून राहत देशमुख यांच्यावर सीबीआयने आरोपपत्र दाखल केले आहे. दरम्यान, अहवाल लीक केल्याप्रकरणी सीबीआयने अनिल देशमुख यांचे वकील आनंद डागा आणि सीबीआयचे सब इन्स्पेक्टर अभिषेक तिवारी यांना अटक केली होती.मुंबईचे तत्कालीन पोलिस आयुक्त परमवीर सिंग यांनी अनिल देशमुख यांच्यावर आरोप केले होते. मुंबईतील बार आणि रेस्टॉरंटकडून कोट्यवधी रुपयांची वसुली केल्याचा हा आरोप होता. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने चौकशीचे आदेश दिले होते. त्यासंदर्भातील अहवाल तयार केला गेला. हा अहवाल पूजा यांनी लीक केल्याचा आरोप आहे.

## मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार कोण? कॉँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांचा भाजपला सवाल

''भाजप विधानसभेची निवडणूक लढत आहे, परंतु निवडून आल्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याची कुणालाच काही कल्पना नाही. आता भाजपचे नेते मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार दुर्बिणीतून शोधत आहेत. भाजपचे नेते एकमेकांना हिट विकेट करण्याच्या प्रयत्नात आहेत,'' असा आरोप कॉँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी केला आहे.राजस्थानमधील टोंक जिल्ह्यातील केकाडी येथील सभेत त्या बोलत होत्या. यावेळी माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट उपस्थित होते. यावेळी प्रियांका गांधी यांनी भाजपच्या अंतर्गत गटबाजीवर टोले हाणले. त्या म्हणाल्या, ''भाजपचे नेते निवडणूक लढवीत आहेत. आता लोक विचारत आहेत की, मुख्यमंत्री कोण, या प्रश्नावर भाजपचे नेते चा चेहरा समोर करीत आहेत.



## सरकारला जातीय दंगली भडकवायच्या आहेत का?

ठाणे : मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे सध्या राज्यभर आरक्षणासाठी जनजागृती करत आहेत. जरांगे मंगळवारी (२१ नोव्हेंबर) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यात दाखल झाले. ठाण्यात त्यांची भव्य रॅली पार पडली. या रॅलीदरम्यान, त्यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. मनोज जरांगे यांनी आरक्षणावरून चालू असलेल्या आंदोलनादरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून आंदोलन बदनाम करू पाहणा-यांवर टीका केली.तसेच अशा लोकांना सरकारचे पाठबळ आहे का? असा प्रश्नदेखील उपस्थित केला.मनोज जरांगे पाटील म्हणाले, मराठा समाजाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शब्दाचा दोन वेळा मान राखला. आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आमच्याकडे वेळेची मागणी केली. आम्ही त्यांना २४ डिसेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. त्यानंतर आम्ही कोणाचे ऐकणार नाही. आम्हाला २४ डिसेंबरपूर्वी आरक्षण हवे आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना आमचे सांगणे आहे की, आम्ही शांततेची बाजू मांडतोय. परंतु, बाकीच्या लोकांना राज्यात दंगल भडकावी असे वाटत आहे. आम्ही शांततेचं आव्हान करतो, हे चुकचे आहे का?मनोज जरांगे पाटील म्हणाले, रात्र-दिवस हे प्रशासन अलर्ट असते. मोर्चे, यात्रा, रॅली, सभा हे सगळे दिवसरात्र चालू असते. क्रिकेटही रात्रीच चालू असते. त्यामुळे आम्हीदेखील रात्र-दिवस लोकांकडे जातो. आम्ही शांततेची बाजू मांडत आहे. आम्ही सरकारची बाजू मांडतोय. राज्यात शांतता नांदावी असा प्रयत्न करतोय. परंतु, काहींना वाटत आहे की राज्यात दंगली व्हायला हव्यात. परंतु, आमची शांततेची भूमिका असूनही आमच्यावरच गुन्हे दाखल केले जात आहेत.मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरागे पाटील राज्य सरकारला उद्देशून म्हणाले, शांततेच्या मार्गाने आमचे आंदोलन चालू आहे. त्याचबरोबर आम्हीदेखील शांततेसाठीच प्रयत्न करत आहोत, तरीदेखील तुम्ही आमच्यावर गुन्हे दाखल करत आहात. तुम्ही राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणा-यांना खतपाणी घालताय का? राज्यात जो जातीयवाद निर्माण करतोय, जो समाजांमध्ये तेढ निर्माण करतोय त्याला या सरकारचं पाठबळ तर नाही ना? राज्य सरकारला राज्यात जातीय दंगली भडकवायच्या आहेत



## केसीआर भ्रष्टाचारात अव्वल, अमित शहा यांचा आरोप; भाजप करणार व्यवहाराची चौकशी

हैदराबाद : ''तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे देशात भ्रष्टाचारात अव्वल आहेत,'' असा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला. ''तेलंगणात भाजपची सत्ता आल्यास बीआरएस सरकारच्या भ्रष्ट व्यवहारांची तपासणी केली जाईल आणि ज्या मंडळींनी गैरप्रकार केला आहे, त्यांना तुरुंगात डांबले जाईल,'' असेही शहा म्हणाले.जनगाव येथे प्रचारसभेत बोलताना शहा यांनी च्या काळातील कथित गैरव्यवहाराचा उल्लेख केला. यात कालेश्वरम प्रकल्प, मद्य गैरव्यवहार आणि हैदराबादच्या मियापूर येथील जमीन व्यवहाराचा समावेश आहे. ''केसीआर हे देशात भ्रष्टाचार करण्यात पहिल्या क्रमांकावर आहेत आणि कडून त्यांच्या भ्रष्ट व्यवहाराची तपासणी करून भ्रष्टाचार करणाऱ्यांना तुरुंगात पाठविले जाईल,'' असे शहा म्हणाले.दोनच दिवसांपूर्वी भाजपने आपल्या संकल्पपत्रात सत्तेत आल्यानंतर आणि धरणीसह विकासाच्या नावावर सुरू केलेल्या अनेक योजनांची चौकशी केली जाईल आणि त्यासाठी समिती नेमली जाईल, असे म्हटले होते. सध्या या योजनेचा खर्च प्रचंड वाढला असून त्यात भ्रष्टाचार होत असल्याचेही भाजपचे म्हणणे आहे. अमित शहा यांनी आणखी एका आश्वासनाची आठवण करून दिली. ते म्हणाले, ''३० नोव्हेंबरच्या निवडणुकीत भाजप सत्तेवर येत असेल तर मागासवर्गीयातील नेत्याला राज्याचे मुख्यमंत्री केले जाईल. शिवाय राज्यातील जनतेला अयोध्येत श्रीराम मंदिराचे मोफत दर्शनाची व्यवस्था केली जाईल.''




## वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई महानगर शहर जिल्हाध्यक्ष पदी दिलीप बंदीचोडे यांची निवड

नवी मुंबई / के. एच. हनवते :- वंचित बहुजन अघाडी राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकूर यांनी दिनांक : २०/११/२०२३ रोजी नवी मुंबई महानगर शहर जिल्हाध्यक्ष पदी दिलीप बंदीचोडे यांची पद नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली. त्यामुळे नवी मुंबईतील वाशी या ठिकाणी आजी - माजी पदाधिकाऱ्यांकडून आनंद व्यक्त करून दिलीप बंदीचोडे यांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन करून पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यावेळी ॲड. संदेश मोरे साहेब (मुंबई हायकोर्ट) उपस्थित होते. ऐरोली तालुका राजेश भालेराव सह आनेक आजी - माजी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. बेलापूर तालुक्यांच्या वतीने सुनील भोले, सुभाष बलखंडे, कल्याणराव हनवते, राहुल शिरसाट, राहुल जाधव, इत्यादी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहुन शाल आणि पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले. आमचे राष्ट्रीय नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर आणि म.प्र.अध्यक्षा रेखाताई ठाकूर यांनी नवी मुंबईला भले ही उशीरा पण डॅन्शिग तरूण तडफदार नवी मुंबई जिल्हाध्यक्ष सह १४ सक्रिय कार्यकर्त्यांची पद नियुक्ती कार्यकारिणी दिल्याबद्दल नवी मुंबईतील कार्यकर्त्यांत एक नवा उत्साह आणि आनंद व्यक्त केला जात आहे.



## स्वस्त धान्य दुकान येथे आयुष्यमान भारत कार्ड शिबीर (बुधवार व शनिवार )

लातूर/प्रतिनिधी:आयुष्यमान भारत - प्रधानमंत्री जनआरोग्य योजना ही केंद्रशासनाची महत्वकांक्षी योजना आहे.आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबाचा आरोग्य विषयक खर्च कमी करणे आणि त्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळेल याची खात्री करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबाना प्रति कुटुंब प्रति वर्ष रु.५ लक्ष चा आरोग्य विमा केंद्रशासनामार्फत लागू करण्यात आलेला आहे.या योजने अंतर्गत मानांकित करण्यात आलेल्या शासकीय व खाजगी रुग्णालयातून विविध १३५६ आजारासाठी रु.५ लक्ष मर्यादेपर्यंत मोफत उपचार व शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी आयुषमान कार्ड / गोल्डन कार्ड / ई-कार्ड काढून घेणे गरजेचे आहे .सदर कार्ड पूर्णपणे मोफत मिळविता येते . तरी सदरील कार्ड काढण्यासाठी महसूल विभागाच्या सहकार्याने शहरातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानाच्या ठिकाणी प्रत्येक बुधवारी व शनिवारी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे .या ठिकाणी ई-सेवा केंद्राचे प्रतिनिधी तसेच आरोग्य विभागाचे आशा स्वंयसेविका ,एएनएम उपस्थित राहून आयुषमान कार्ड शझूलकरून देणार आहे.

तरी नागरिकांनी आपल्या भागातील स्वस्त धान्य दुकान येथे आधार कार्ड व आधारकार्डशी लिंक असलेल्या मोबाईल सह सकाळी १०.०० ते २.०० वेळेस उपस्थित रहावे. व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत आपले आयुषमान कार्ड काढून घ्यावे असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे .

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE